तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, येवती संचलित

# व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

## मराठी विभाग वार्षिक अहवाल : २०२२ – २०२३

मराठी विभागामध्ये शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये विविध उपक्रमाचे आयोजन केले होते. या शैक्षाणिक वर्षामध्ये नियमित अध्यापन कार्यासाठी सत्रानुरूप अभ्यासक्रमाचा नियोजित आराखडा तयार करुन त्याची पुर्तता करण्यात आली.

### प्रथम सत्र :

प्रथम सत्रामध्ये पुढील उपक्रम राबवण्यात आले.

### सत्र पहिले :

दिनांक ०१/०८/२०२२ ते दिनांक १९/१०/२०२२ या कालावधीत पहिले सत्र संपन्न झाले.

### १. राज्यस्तरीय एकदिवसीय : गीत लेखन कार्यशाळेत सहभाग :



रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद येथील मराठी विभागाच्यावतीने राज्यस्तरीय एकदिवसीय गीतलेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत महाविद्यालयातील मराठी विभागांतर्गत बी.ए.प्रथम वर्षाच्या एकूण २० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांसोबत मराठी विभागातील सर्व सहाय्यक प्राध्यापकांनी सहभाग नोंदवला. ही कार्यशाळा एकूण दोन सत्रामध्ये पूर्ण झाली. कार्यशाळेसाठी उद्घाटक म्हणून प्रा.डॉ.विनायक पवार, प्रमुख पाहुणे मा.योगीराज माने, अध्यक्ष मा.प्रभाजी प्राचार्य घोडके शांतीलाल, प्रा.शिवाजीराव देशमुख, मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.शिवाजी गायकवाड, प्रा.डॉ.अरविंद हंगरगेकर, प्रा.डॉ.जगताप यांची उपस्थिती होती गीतलेखनाच्या दृष्टीने प्रा.डॉ.विनायक पवार व मा.योगीराज माने यांनी मार्गदर्शन केले.

२. बी.ए.प्रथम, द्वितीय, तृतीय आणि बी.एस्सी., बी.कॉम प्रथम, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या घटक चाचणी परीक्षांचे आयोजन करण्यात आले.

### ३.परिसंवाद :

विद्यार्थ्यांनी चिकित्सक पध्दतीने विचार करावा व संभाषण कौशल्य वाढावे यासाठी वर्गनिहाय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

**द्वितीय सत्र** : दिनांक ०४/११/२०२२ ते दिनांक २१/०३/२०२३ या कालावधीत द्वितीय सत्र संपन्न झाले.

या सत्रामध्ये प्राध्यापकनिहाय निश्चित करण्यात आलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला.

**१) सेतू प्रमाणपत्र अभ्यासक्रम (ब्रीज कोर्स) :-**



मराठी विभागामध्ये बी.ए. व एम.ए.मराठी प्रथम वर्षासाठी सेतू प्रमाणपत्र अभ्यासक्रम (ब्रीज कोर्स) राबविण्यात आला. हा अभ्यासक्रम दिनांक ०९/११/२०२२ ते दिनांक १९/११/२०२२ या कालावधीमध्ये पूर्ण करण्यात आला. एकूण १० दिवसामध्ये एक तासिका ५० मिनिटांची या प्रमाणे दररोज ०३ तासिका दुपारी २:०० ते ४.३० या वेळेत घेण्यात आल्या. सेतू प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या एकूण ०५ घटकाचे प्रत्येकी एक याप्रमाणे अध्यापन करण्यात आले. सर्व घटकांच्या अध्यापनानंतर विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन त्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

**२. चोखोबा ते तुकोबा : एक वारी समतेची :-**




समता, बंधुता, मानवता आणि सामाजिक लोकशाही या वारकरी संप्रदायातील मूल्यांच्या उत्कर्ष व संवर्धनासाठी संत चोखामेळा अध्यासन केंद्र चोखोबा ते तुकोबा : एक वारी समतेची मध्यवर्ती संयोजन समिती, आयोजित चोखोबा ते तुकोबा एक वारी समतेची श्री संत चोखामेळा महाराज कर्मभूमी श्री क्षेत्र मंगळवेढा ते श्री संत तुकोबाराय जन्मभूमी श्री क्षेत्र देहुगाव पर्यंत ही वारी जाते. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक ०३ जानेवारी २०२३ रोजी महाविद्यालयामध्ये या वारीचे आमगन झाले. मराठी विभागाच्यावतीने या वारीचे स्वागत करण्यात आले. या वारीचा समारोप प्रा.डॉ.सहदेव रसाळ यांच्या घरी आयोजित केलेल्या समता भोजनाने झाला.

### ३. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा :-




(दिनांक १४ ते २८ जानेवारी २०२३)

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी विभाग व भाषा संचालनालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दिनांक २४ जानेवारी २०२३ रोजी साजरा करण्यात आला. या निमित्ताने ''उस्मानाबाद जिल्ह्यातील भाषा, साहित्य व संस्कृती'' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानास प्रमुख वक्ता म्हणून उस्मानाबाद येथील ज्येष्ठ कवी व साहित्यिक डी.के.शेख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी सर मंचावर भाषा संचालनालयाचे महेश लगड, ज्येष्ठ कवी राजेंद्र अत्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी साहित्यिक डी.के.शेख यंनी उस्मानाबाद जिल्ह्यातील भाषा, साहित्य व संस्कृती यावर सविस्तर विवेचन केले.

### ४. मराठी राजभाषा दिन :-



मराठी राजभाषा दिनाच्या निमित्ताने दिनांक २७ फेब्रुवारी २०२३ रोजी मराठी विभाग, व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, व्होकेशनल महाविद्यालय आणि अक्षरवेल महिला साहित्य मंडळ, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय विशाखा जिल्हा साहित्य संमेलन आयोजित केले होते. या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिका श्रीमती स्नेहल पाठक या होत्या. संस्थेचे कोषाध्यक्ष मा.शेषाद्री (अण्णा) डांगे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी, माजी प्राचार्या डॉ.अनार साळुंखे आणि अक्षरवेल साहित्य मंडळ धाराशिवच्या अध्यक्षा श्रीमती डॉ.रेखा ढगे, मा.कमलताई नलावडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

हे साहित्य संमेलन एकूण पाच सत्रामध्ये संपन्न झाले. पहिल्या सत्रामध्ये उद्घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला. संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात सकाळी १० ते ११ या वेळेत 'आधुनिक मराठी स्त्री साहित्यिकांचे सामाजिक परिवर्तनातील योगदान' या विषयावर परिसंवाद पार पडला. या परिसंवादात माजी प्राचार्या डॉ.अनार साळुंखे आणि प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी

यांची अभ्यासपूर्ण मांडणी झाली. या परिसंवादाचे अध्यक्षस्थान मा.कमलताई नलावडे यांनी भूषविले. याप्रसंगी प्रश्नोत्तराचे सत्रही संपन्न झाले. सूत्रसंचालन आणि आभार एम.ए.मराठी प्रथम वर्षाची विद्यार्थीनी किरण जंगमे यांनी मानले.

तिसरे सत्र सकाळी ११ ते १२ या वेळेत संपन्न झाले. या सत्रात 'गझल कट्टा' हा कार्यक्रम संपन्न झाला. या सत्राचे अध्यक्षस्थान सौ.स्नेहलता झरकर यांनी भूषविले. या सत्रामध्ये महिला गझलकार मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या सत्रानंतर दुपारी १२ ते ०१ या वेळेत भोजन अवकाश घेण्यात आला. या वेळेत 'अय्यऽऽ' ही एकांकिका नाट्यशास्त्र व लोककला विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपपरिसर धाराशिव आणि व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने सादर करण्यात आली.

या साहित्य संमेलनाचे चौथे सत्र दुपारी ०२ ते ०३ या वेळेत पार पडले. या सत्रामध्ये कथाकथनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या सत्राच्या अध्यक्षा सौ.सुनिता गुंजाळ या होत्या. या सत्रात धाराशिव परिसरातील कथा लेखिकांनी आपल्या विविध कथांचे सादरीकरण केले. या संमेलनाचे शेवटचे पाचवे सत्र दुपारी ०३ ते ०५ या वेळेत संपन्न झाले. या सत्रात काव्य संमेलन आणि समारोप कार्यक्रम संपन्न झाला. काव्य संमेलनाच्या अध्यक्षा सौ.अपर्णा चौधरी या होत्या. या सत्रात जिल्ह्यातील कवयित्रींनी व विद्यार्थिनींनी आपल्या कवितांचे सादरीकरण केले.

हे साहित्य संमेलन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी, अक्षरवेल महिला साहित्य मंडळाच्या अध्यक्षा सौ.रेखा ढगे व त्यांच्या सहकारी महिला आणि महाविद्यालयातील मराठी विभागातील प्रा.डॉ.सहदेव रसाळ, प्रा.प्रमोद पाटील, प्रा.डॉ.कृष्णा तेरकर, प्रा.डॉ.मारूती गोरे यांच्या विशेष परिश्रमातून संपन्न झाले.

**५. निबंध लेखन :-**

महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने चोखोबा ते तुकोबा : एक वारी समतेची २०२३ उस्मानाबाद जिल्ह्यातील आगमन निमित्ताने भव्य निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये व्यंकटेशन महाजन वरिष्ठ महाविद्यालय व व्होकेशनल महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. वरिष्ठ महाविद्यालय गटामध्ये काशिद अंजली लक्ष्मण या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक पटकावला. तर कनिष्ठ महाविद्यालय गटात सुतार प्रतिक बबन (प्रथम), कदम गौतमी लिंबाजी (द्वितीय), रोकडे प्रतिक्षा पांडुरंग (द्वितीय), तेलंग पार्थ विनोद (तृतीय), सिरसाटे निकिता बळीराम (उत्तेजनार्थ) या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.

मराठी विभाग, व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, व्होकेशनल महाविद्यालय व अक्षरवेल महिला, साहित्य मंडळ, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने कुसुमाग्रज जयंती व मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित विशाखा जिल्हा साहित्य संमेलन सोमवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२३ रोजी आयोजित केले होते. त्या निमित्ताने निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन केले होते. या निबंध लेखन स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. वैरागे नेहा दिगंबर (प्रथम), लोकरे पद्मजा समीर (द्वितीय), तेलंग पायल विनोद (द्वितीय), राठोड काजोल धोंडीराम (तृतीय) या विद्यार्थिनींनी क्रमांक प्राप्त केले. या सर्व विद्यार्थिनींना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

६.काव्य वाचन :-

मराठी राजभाषा दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयामध्ये काव्यवाचन स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी बहुसंख्येने सहभाग नोंदवला.

७. भित्तीपत्रक :-



कुसुमाग्रज जयंती व मराठी राजभाषा दिनानिमित्ताने भित्तीपत्रक तयार करण्यात आले. यासाठी विद्यार्थ्यांनी कृतीयुक्त सहभाग नोंदवला. संस्थेचे कोषाध्यक्ष मा.शेषाद्री (अण्णा) डांगे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी, मराठी विभागप्रमुख डॉ.सहदेव रसाळ यांच्या हस्ते भित्तीपत्रकाचे विमोचन केले. सर्वांनी सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

८. वक्तृत्व स्पर्धा :-

महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने महाज्योती नागपूर व मराठी विभाग, व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय उस्मानाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा स्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील विविध विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

वरीलप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षामध्ये सत्र १ व सत्र २ मध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सहाय्यक प्राध्यापक

डॉ.सहदेव रसाळ

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय कार्यालय उस्मानाबाद

प्राचार्य

डॉ.प्रशांत चौधरी

प्राचार्य
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय
उस्मानाबाद ४१३५०१